केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत प्रकल्पांच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक :- अमृत-२०२२/प्र.क्र.२०३/नवि-३३**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक :- १६ सप्टेंबर, २०२२**

**संदर्भ:**

१. शहर व नगर विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या अमृत २.० योजनेच्या मार्गदर्शक सूचना
२. नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-३३, दि. १४/०७/२०२२
३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पत्र क्र. जा.क्र. मजीप्रा /सस/तांशा-४/४७९, दि. ८ एप्रिल, २०२१
४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय क्र. ग्रापाधो-२०२१/प्र.क्र.१२२/पापु-७, दि. २९ जून, २०२२
५. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पत्र क्र. जा.क्र. मजीप्रा /सस/तांशा-१/९९७, दि. २६ जुलै, २०२२

## परिपत्रक

१. केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विविध प्रकल्पांची कामे वेगाने व सक्षमपणे अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सदर अभियानाचे प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (PDMC) म्हणून नेमण्यात येत आहे, PDMC ची कामे अमृत २.० अभियानाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राहतील. केंद्र पुरस्कृत अमृत अभियान २.० योजनेंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास एकूण प्रकल्प किंमतीच्या ०.५० % रक्कम प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणून प्रकल्पांच्या प्रगतीच्या टप्प्यानुसार अदा करण्यात येईल.

२. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी अमृत २.० अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तातडीने तांत्रिक मान्यता घ्यावी त्याकरिता प्रकल्प किंमतीच्या १% शुल्क महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा करावे, सदर १% शुल्काच्या रक्कमेचा प्रकल्प किंमतीमध्ये समावेश करावा.

३. अमृत २.० अभियानांतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुढील ३ पर्यायापैकी एक पर्याय निवडण्याची मुभा राहील:-

अ. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमता येईल.

आ. संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची (PMC) एकूण १६ संस्थांची नामिका (empanelment) तयार केली असून त्यापैकी कोणत्याही एका संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड करणे.

इ. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने विहित केलेल्या मॉडेल RFP नुसार निविदा प्रक्रिया करून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) नेमणूक करण्याची मुभा राहील.

४. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दि.१५.१०.२०२२ पर्यंत सर्व प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर करावेत व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि.३१.१०.२०२२ पर्यंत सर्व प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना तांत्रिक मान्यता द्यावी.

**५.** संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प किंमत निहाय वर्गवारी करून प्रत्येक वर्गवारीकरिता विहित केल्यानुसार PMC शुल्क अदा करावे तथापि, संदर्भांकित आदेशान्वये रु. ५ कोटी प्रकल्प किंमतीपर्यंत ३.२० % PMC शुल्क विहित केले आहे, त्याऐवजी सदर वर्गवारीतील प्रकल्पांना कमाल ३% मर्यादेतच PMC शुल्क अदा करावे.

६. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराकरिता (PMC) संदर्भ क्र. ४ अन्वये विहित केलेल्या दरापेक्षा कमी दराने काम करण्यास एखादी संस्था तयार असल्यास परिच्छेद क्र.३ (इ) नुसार त्यांची निवड करण्याची नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस मुभा राहील.

७. अमृत २.० अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आदर्श निविदा पुस्तिका (Model Tender Document) तयार करून देण्यात येईल त्यानुसार, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी निविदा प्रक्रिया राबविणे बंधनकारक राहील तसेच, सदर आदर्श निविदा पुस्तिकेतील तरतुदीपेक्षा कोणतीही वेगळी तरतूद विहित करावयाची झाल्यास त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक राहील.

८. अमृत २.० अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांची नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पातळीवर शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धती नुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी व यशस्वी निविदा धारकाची निवड करून त्यास कार्यादेश देण्यात यावेत, निविदा प्रक्रियेस वेगळ्याने शासनाच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

९. प्रकल्पासाठी निविदा प्रक्रियेद्वारे निवडलेल्या कंत्राटदारास मोबिलाईझेशन ॲडव्हान्स (Mobilisation Advance) देण्यात येऊ नये.

१०. निविदा चालू दर सूचीनुसार प्रसिद्ध केली असल्यास सामान्यतः अधिक दराची निविदा स्वीकारू नये तथापि, जर अधिक दराची निविदा स्वीकारल्यास सदर अतिरिक्त खर्चाचा भार संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वीकारणे बंधनकारक राहील.

११. अमृत २.० अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या संदर्भांकित दिनांक २९ जून, २०२२ मधील तरतुदी लागू राहतील.

**१२.** महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालयामध्ये अमृत २.० योजनेंतर्गत आवश्यक मनुष्यबळासह प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) स्थापन करण्यात येईल तसेच, शहर स्तरावर अभियान संचालनालयाच्या धर्तीवर प्रत्येक महानगरपालिका स्तरावर संबंधित आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली शहर अभियान कक्ष स्थापन करण्यात यावा.

१३. अमृत २.० अभियानाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रशासकीय व कार्यालयीन खर्चासाठी निधी प्रधान सचिव (नवि-२) यांच्या मान्यतेने विनियोगात आणावा.

१४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०९१६१५१५१९८१२५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(श्रीकांत चं. आंडगे)**
**उप सचिव, नगर विकास विभाग**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
२. प्रधान सचिव (न.वि. -२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
६. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
७. जिल्हाधिकारी (सर्व).
८. सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
९. जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व).
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
११. निवडनस्ती, नवि-३३.